**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**शनिवार दिनांक २५ जुलै २०२६**

**ठळक बातम्या**

1. **केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा, सीजेपीची आंदोलन मागे घेतल्याची घोषणा.**
2. **आज सर्वत्र देवशयनी आषाढी एकादशीचा उत्साह, मुख्यमंत्र्याच्या हस्ते शासकीय महापूजा संपन्न.**
3. **संत्रा होऊ शकतो विदर्भाच्या कृषी अर्थव्यवस्थेचा मुख्य भाग -केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला विश्वास.**
4. **विदर्भात येत्या 29 तारखेपर्यंत वादळी पर्जन्यमानासह पावसाची शक्यता.**

---------------------------------

धर्मेंद्र प्रधान राजीनामा

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. भारताचे तरुण हेच या देशाची खरी ताकद आहेत आणि त्या ताकदीला कुणी संभ्रमित करू नये हाच आपला संकल्प आहे. जंतर मंतरवरचं आंदोलन आणि देशातली एकंदर परिस्थिती पाहता याचा फायदा देशविरोधी घटकांनी घेऊ नये तसंच विद्यार्थ्यांनी आपला वेळ आणि ताकद आपली कारकिर्द घडवण्यासाठी लावावी या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे राजीनामा सुपूर्द करत असल्याचं प्रधान यांनी समाज माध्यमावरील पत्रात म्हटलं आहे. या संपूर्ण प्रकरणात आपण पहिल्या दिवसापासून पूर्ण जबाबदारी स्वीकारली आणि कधीही परिस्थितीपासून दूर पळालो नाही, असेही प्रधान यांनी स्पष्ट केल. १६ जुलै रोजी जाहीर झालेल्या नीट-यूजी निकालात वंचित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील अनेक गुणवंत विद्यार्थ्यांना यश मिळाल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, या काळातही काही जबाबदार पदांवरील व्यक्तींनी विद्यार्थ्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला.नीट पेपरफुटी प्रकरणासह अन्य मागण्यांसाठी गेल्या काही दिवसांपासून नवी दिल्लीत जंतर मंतरवर कॉकरोच जनता पार्टीच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू आहे. (सीजेपी) या संघटनेचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याचे स्वागत करत, ही लोकशाहीची विजय असल्याचे म्हटले आहे.

-----------------------------------

भाजप-सीजेपी परिषद

कॉक्रोज जनता पार्टी (CJP)आणि केंद्र शासनातर्फे आज दिल्ली येथील कॉन्स्टीट्यूशन क्लब येथील संयुक्त पत्रकार परिषदेत विद्यार्थी आंदोलनासंदर्भातील महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आली. सरकारने आंदोलक विद्यार्थ्यांच्या सर्व प्रमुख मागण्या मान्य केल्यामुळे कॉक्रोच जनता पार्टीने आपले आंदोलन मागे घेत असल्याची घोषणा सीजेपीचे प्रवक्ते सौरव दास आणि आशुतोष रांका यांनी पत्रकार परिषदेत केली.

***(होल्ड बाईट - सौरव दास 14 सेकंद)***

आंदोलनकर्त्यां विरुद्ध दाखल करण्यात आलेले एफआयआर मागे घेण्याची CJPची मागणी केंद्र सरकारने मान्य केली असून, यापुढे भविष्यात आंदोलनकर्त्यांविरुद्ध कोणतेही नवीन गुन्हे दाखल करण्यात येणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. परीक्षा पेपरफुटीमुळे झालेल्या विद्याध्यांच्या जीवितहानी प्रकरणी त्यांच्या कुटुंबीयांना नियमानुसार नुकसानभरपाई देण्याबाबत सरकार सहानुभूतीपूर्वक विचार करणार असल्याचे केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी.नड्डा यांनी सांगितलं...

***(होल्ड बाईट - केंद्रीय मंत्री जेपी नड्डा)***

व्यापक शिक्षण व परीक्षा विषयक CJPने सादर केलेल्या पाच कलमी मसुद्यावरही सरकार गांभीर्याने विचार करणार असल्याची माहिती यावेळी केंद्रीय आरोग्य मंत्री डॉ.जे.पी.नड्डा आणि केंद्रीय राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी दिली.

-----------------------------------

शरद पवार

गेल्या अनेक दिवसांपासून दिल्लीतील जंतर-मंतर येथे हजारो विद्यार्थ्यांनी विविध मागण्यांसाठी सुरू केलेल्या आंदोलनानंतर अखेर केंद्र सरकारने महत्त्वाचा निर्णय घेत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा स्वीकारल्याची मोठी राजकीय घडामोड समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार)चे अध्यक्ष शरद पवार यांनी पत्रकार परिषद घेत विद्यार्थ्यांच्या एकजुटीचे आणि संयमाने दिलेल्या लढ्याचे कौतुक केले. त्यांनी हा देशातील युवाशक्तीचा मोठा विजय असल्याचे सांगत आंदोलनाला नैतिक पाठिंबा देणाऱ्या विरोधी पक्षातील सर्व खासदारांचेही आभार मानले.

-----------------------------------

राहुल गांधी प्रतिक्रीया

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी विद्यार्थी आणि युवकांचे अभिनंदन केले आहे. समाजमाध्यमावरील व्हिडीओ संदेशात त्यांनी, शिक्षण व्यवस्थेच्या पुनर्बांधणीच्या दिशेने हा महत्त्वाचा टप्पा असल्याचे म्हटले आहे.आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कारवाई करणाऱ्या आणि त्यांच्यावर अत्याचार करणाऱ्या सर्व संबंधितांवर कठोर कारवाई करावी, तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांची माफी मागावी, अशी मागणी त्यांनी केली.

---------------------------------

टीईटी प्रश्नपत्रिका फुटी

टीईटी अर्थात महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणातले मुख्य सूत्रधार मानले जाणारे बिजेंद्र कुमार गुप्ता आणि इंद्रजीत सिन्हा यांना भिवंडी पोलिसांनी बिहारमधून अटक केली आहे. याआधी, या प्रकरणात १२ आरोपींना अटक झाली होती. या कारवाईनंतर या प्रकरणातील एकूण अटक आरोपींची संख्या १४ वर पोहोचली आहे. प्रश्नपत्रिका फुटल्यामुळे २८ जून रोजी होणारी टीईटी परीक्षा पुढे ढकलण्यात आली होती.

---------------------------------

देवशयनी आषाढी एकादशी

महाराष्ट्रात आज सर्वत्र देवशयनी आषाढी एकादशीचा उत्साह आहे. पंढरपूरमध्ये आषाढी एकादशीनिमित्त आज पहाटे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सपत्नीक श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा केली. यंदाचे मानाचे वारकरी धाराशिव जिल्ह्यातील बाबासाहेब माने आणि प्रभावती माने यांनीही मुख्यमंत्र्यांसोबत विठूरायाची पूजा केली. त्यानंतर श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीनं त्यांचा सत्कार करण्यात आला. मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या सुख-समृद्धीसाठी, शेतकऱ्यांच्या भरभराटीसाठी आणि प्रत्येक नागरिकाच्या मंगलमय जीवनासाठी विठ्ठलाच्या चरणी प्रार्थना केली.देशातील प्रत्येक युवक-युवतीला आपल्या स्वप्नांना गवसणी घालण्याची प्रेरणा आणि संधी मिळावी, तसेच विकसित भारताच्या निर्मितीचा हा प्रवास अधिक वेगाने पुढे जावा, यासाठीही विठूमाऊलीच्या चरणी प्रार्थना केल्याच मुख्यमंत्र्यांनी सांगितल.

(***होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 31 सेकंद***)

श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या मंदिर परिसर विकासाचं काम करताना कोणावरही अन्याय होऊ दिला जाणार नाही, सर्वांचं योग्य पुनर्वसन करून हे काम येत्या अडीच वर्षांत

पूर्ण करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. आषाढी वारीनिमित्त पंढरपूर इथल्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचं मंदिर विविध रंगीबेरंगी फुलांनी आकर्षक पद्धतीने सजविण्यात आलं आहे. आषाढी एकादशीनिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. भक्ती, करुणा आणि सेवाभावाचा शाश्वत संदेश देणारा हा पवित्र दिवस प्रत्येकाच्या जीवनात आनंद, सौहार्द आणि समृद्धी घेऊन येवो, अशी त्यांनी विठ्ठल चरणी प्रार्थना केली. प्रत्येक व्यक्तीच्या कल्याणासाठी आणि सन्मानासाठी अखंड सेवाभावाने कार्य करण्याचा संकल्प अधिक दृढ होवो, अशी प्रार्थनाही मोदी यांनी केली.

---------------------------------

आषाढी विदर्भ

विदर्भात आषाढी एकादशीचा उत्साह बघायला मिळाला. आषाढी एकादशीनिमित्त विदर्भातील नागपूर नजीक श्रीक्षेत्र धापेवाडा इथं आज पहाटे तीन वाजता श्री विठ्ठलाची आ.डॉ.राजीव पोतदार व जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पूजा केली. भाजप महिला मोर्चातर्फे यवतमाळमध्ये भव्य *'विठुरायाची पंढरीची वारी'* काढण्यात आली. विठ्ठलनामाचा गजर, टाळ-मृदुंगाचा निनाद, भगव्या पताका आणि आकर्षक दिंड्यांनी शहर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले.अवधूतवाडी व्यायामशाळेपासून रुक्मिणी पांडुरंग संस्थानपर्यंत ही वारी उत्साहात पार पडली. भंडारा शहरात २ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी वारी काढली. तसंच गांधी चौकात एकत्र येत विद्यार्थ्यांनी रिंगण घातलं. बुलढाणा जिल्ह्यात प्रति पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संतनगरी शेगाव इथं श्री संत गजानन महाराज समाधी मंदिराचा परिसर आज पहाटेपासूनच गण गण गणात बोते या जयघोषानं दुमदुमून गेला आहे. शेजारच्या राज्यातूनही हजारो वारकरी आणि भाविक शेगावात दाखल झाले आहेत. मंदिर परिसरात आणि शहरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

---------------------------------

नितीन गडकरी

विदर्भातील कृषी क्षेत्रातील आव्हानांवर मात करण्यासाठी रोगमुक्त रोपांची निर्मिती, शेतकरी आणि रोपवाटिकांना योग्य प्रशिक्षण आणि संशोधनाचा लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले. भारतीय कृषी संशोधन परिषद (ICAR) अंतर्गत केंद्रीय लिंबूवर्गीय फळ संशोधन संस्थान येथे केंद्र सरकारच्या क्लीन प्लांट उपक्रमाअंतर्गत आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. विदर्भातील संत्रा हा नागपूरची

जागतिक ओळख असून, रोगमुक्त रोपांच्या माध्यमातून तो कृषी अर्थव्यवस्थेचा प्रमुख आधार ठरू शकतो, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी संस्थेचे संचालक डॉ. दिलीप कुमार घोष, मुख्य शास्त्रज्ञ डॉ. ए. के. दास आणि श्री. सुधीर दिवे उपस्थित होते. कार्यशाळेत आसाम, छत्तीसगड, जम्मू-काश्मीर, मणिपूरसह १२ राज्यांतील अधिकारी आणि अभ्यासक सहभागी झाले. महाराष्ट्रातील रोपवाटिका कायद्यात त्यांच्या प्रयत्नांमुळे करण्यात आलेल्या सुधारणांचाही यावेळी उल्लेख करण्यात आला.

----------------------------------

हवामान

विदर्भात येत्या 29 तारखेपर्यंत वादळी पर्जन्यमानासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. आज आणि उद्या संपूर्ण विदर्भात विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना होण्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवला आहे. तर 29 तारखेला नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली या पूर्व विदर्भातील जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान आगामी काही तासांमध्ये अमरावती, वर्धा आणि यवतमाळ या ठिकाणी अत्यंतहलक्या स्वरूपाची पर्जन्यवृष्टी होऊ शकते तर वाशीम, अकोला, नागपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. दरम्यान, गोंदिया जिल्ह्यात समाधानकारक पावसामुळे खरीप हंगामातील शेती कामांना वेग आला आहे. याउलट अकोला जिल्ह्यात अद्यापही समाधानकारक पाऊस झालेला नाही. अकोला शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या काटेपूर्णा प्रकल्पात केवळ २० टक्के पाणीसाठा उपलब्ध असल्याने चिंता वाढली आहे.

----------------------------------

'मन की बात'

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या सकाळी अकरा वाजता आकाशवाणीवरील 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासीयांशी आणि परदेशातील भारतीयांशी संवाद साधणार आहेत. या मासिक रेडिओ कार्यक्रमाचा हा १३६ वा भाग आहे. या कार्यक्रमाचे प्रसारण आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, आकाशवाणी वृत्त संकेतस्थळावर तसेच न्यूज ऑन एआयआर या मोबाईल ॲपवर केले जाईल. आकाशवाणी वृत्त, डीडी न्यूज, पंतप्रधान कार्यालय आणि माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब वाहिन्यांवरूनही या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण केले जाणार आहे.

हिंदीतील प्रसारणानंतर आकाशवाणीच्या प्रादेशिक भाषांमधूनही या कार्यक्रमाचे प्रसारण करण्यात येईल.

-----------------------------------